पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट


अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १६० ■ बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ Email: citynewss80@gmail.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा

तुम्ही साकारलेली प्रत्येक गोष्ट तुमच्या मेहनतीचा
आणि समर्पणाचा परिणाम आहे आपल्या कार्याचा नेहमीच

**आम्हाला अभिमान आहे**




**आमचे आधारवड, प्रेरणास्थान**

आर आर सी समूहाचे संस्थापक ,अकोला कॉन्ट्रॅक्टर अँड इंजिनियर असोसिएशनचे अध्यक्ष

# प्रदीपजी देशमुख

**यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा**

**शुभेच्छुक : आर आर सी नेटवर्क व सिटीनुज सुपरफास्ट**

# मेळघाटातील प्रत्येक गावातून आलेल्या आदिवासींची ऐतिहासिक 'संसदवारी' खासदार बळवंतराव वानखडे यांचा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अमरावती:** ज्यांनी आजवर आपल्या गावाची वेस कधी ओलांडली नाही, अशा संपूर्ण मेळघाटातील कानाकोपऱ्यातून आणि प्रत्येक गावातून आलेल्या आदिवासी बांधवांनी थेट देशाची राजधानी गाठून ऐतिहासिक संसद भवनाला भेट दिली. अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे आणि माजी मंत्री व आमदार ॲड. यशोमतीताई ठाकूर यांच्या अभिनव संकल्पनेतून मेळघाटातील या बांधवांचे 'संसद दर्शन' घडले. विशेष म्हणजे या दौऱ्यात मेळघाटातील प्रत्येक गावाचे प्रतिनिधित्व होते. या अविस्मरणीय सहलीमुळे मेळघाटातील आदिवासी बांधव भारावून गेले असून, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबवलेला हा उपक्रम कौतुकाचा विषय ठरला आहे.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा निसर्गरम्य असला तरी अतिशय दुर्गम भाग म्हणून ओळखला जातो. येथील अनेक नागरिक आजही बाहेरील जगापासून अलिप्त आहेत. अशा परिस्थितीत या बांधवांना देशाच्या लोकशाहीचे मंदिर पाहता यावे आणि जगाशी त्यांचा संपर्क वाढावा, यासाठी खासदार बळवंतराव वानखडे यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या या प्रयत्नांमुळे मेळघाटातील प्रत्येक



गावातील नागरिक थेट नवी दिल्लीतील संसद भवनात पोहोचले.

**प्रियंका गांधींशी अनौपचारिक संवाद**

या विशेष दौऱ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे, काँग्रेसच्या राष्ट्रीय सरचिटणीस तथा खासदार प्रियंकाजी गांधी आणि संघटन सरचिटणीस खासदार के.सी. वेणुगोपाल यांच्याशी झालेली भेट. खासदार वानखडे यांनी या बड्या नेत्यांशी आदिवासी बांधवांची प्रत्यक्ष भेट घडवून आणली. यावेळी आदिवासी बांधवांनी आपले गाऱ्हाणे आणि प्रेम या नेत्यांसमोर व्यक्त केले. इतक्या मोठ्या नेत्यांना समोर पाहून आणि भव्य संसद भवन पाहून उपस्थितांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान पाहायला मिळाले.

**सांघिक प्रयत्नातून संकल्पना पूर्ण**

ही संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी राज्याच्या माजी पालकमंत्री तथा आमदार ॲड. यशोमतीताई ठाकूर, काँग्रेसचे अमरावती ग्रामीण जिल्हाध्यक्ष बबलूभाऊ देशमुख आणि चिखलदरा काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. हा उपक्रम केवळ एक सहल नसून, दुर्गम भागातील जनतेला देशाच्या सर्वोच्च सभागृहाची ओळख करून देणारा एक 'सामाजिक पूल' ठरला आहे. या ऐतिहासिक दिल्ली दौऱ्यात आणि संसद भेटीदरम्यान खासदार बळवंतराव वानखडे यांच्यासह माजी जि.प. सभापती दयारामजी काळे, चिखलदरा काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष सहदेव बेलकर, धारणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राहुल येवले, चिखलदरा अनु. जाती काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मेहपतसिंग उईके, संजयभाऊ बेलकर, राजेशभाऊ सेमलकर, मेळघाट विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष पियुष मालवीय, नानकराम ठाकरे, तोताराम कास्देकर, सोनाजी कास्देकर, शिकारी बेठेकर, तसेच चिखलदरा काँग्रेस कमिटीचे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार रवी राणा यांच्या पाठपुराव्यामुळे 4,256 लाभार्थ्यांना पी आर कार्ड, फ्लॅट, घरकुल योजनांचा लाभ

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**आ. रवी राणा यांनी जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त यांच्या उपस्थितीत आदिवासी नगर, पाच बंगला, कपिल वस्तू नगर या परिसरातील नागरिकांना प्रमाणपत्र वाटप**




**अमरावती:**

मुख्यमंत्री, पालकमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार रवी राणा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शहरातील झोपडपट्टीधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना विविध घरकुल योजनांचा मोठा लाभ मिळाला आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत एकूण ४,२५६ लाभार्थ्यांना लाभ मंजूर करण्यात आला आहे.

घटक क्रमांक ३ अंतर्गत ८२५ झोपडपट्टीधारकांना पात्रता कार्डांचे वाटप करण्यात आले. यामध्ये जया ८६० प्लेट अंतर्गत लाभार्थ्यांचा समावेश आहे. तसेच पी.आर. कार्ड अंतर्गत आदिवासी नगर, पाच बंगला, कपिलवस्तू नगर येथील ३०५ लाभार्थ्यांना कार्डांचे वितरण करण्यात आले. याशिवाय, १,२०० घरकुलांच्या सभासदांना घटक क्रमांक ४ अंतर्गत लाभ देण्यात आला आहे. बीएमसी अंतर्गत एकूण ४,२५६ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मंजूर झाला असून, आज एमआयएस प्रणालीवरून मंजुरी काढण्यात आली.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार रवी राणा यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात भाजपा शहर अध्यक्ष डॉ नितीन धांडे, भाजपचे बादल कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. यावेळी आमदार रवी राणा यांनी शासनाच्या घरकुल योजनांचा लाभ गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने केलेल्या कार्याचे कौतुक केले तसेच भविष्यातही नागरिकांच्या हक्काच्या घरासाठी आपला पाठपुरावा सुरूच राहील, असा विश्वास व्यक्त केला.

# राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धा 2025-26 चे अमरावती येथे आयोजन

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अमरावती :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे १७ व १९ वर्ष मुले व मुलींची राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धा सन २०२५-२६ चे आयोजन दि. १७ ते २० डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. गुरूवार, दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.

जिल्हा क्रीडा संकुलाच्या खेलो इंडिया आर्चरी आंतरराष्ट्रीय रेंजवर स्पर्धा होणार आहे. राज्यातील ८ महसूल विभाग आणि १ क्रीडा प्रबोधिनी, पुणे अशा एकूण ९ विभागांतील १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली यात सहभागी होणार आहेत. स्पर्धेसाठी सुमारे ४८५ खेळाडू, संघव्यवस्थापक, प्रशिक्षक आणि निवड समिती सदस्य उपस्थित राहणार आहेत. उद्घाटक कार्यक्रमाला जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, राज्य ऑलिम्पीक संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, राज्य धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदूरकर उपस्थित राहतील. उद्घाटन समारंभात आर्चरी खेळातील आंतरराष्ट्रीय खेळाडू तुषार शेळके, मानव जाधव, कुमकुम मोहोड, यशदिप भोगे, मधुरा धामणगांवकर, पुर्वशा शेंडे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. निवड समिती इंडियन, कंपाऊंड व रिकर्व्ह या क्रीडा प्रकाराचे निरीक्षण करून महाराष्ट्र राज्याच्या १७ व १९ वर्ष मुले व मुलींच्या संघाची निवड करतील. महाराष्ट्र राज्याचा संघ दि. २० डिसेंबर रोजी सायंकाळी घोषित करण्यात येणार आहे. निवड झालेल्या संघातील खेळाडू झारखंड व मणिपूर येथे होणाऱ्या ६९व्या राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेत प्रतिनिधित्व करतील. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना आकर्षक मेडल्स व प्राविण्य प्रमाणपत्रे. तसेच सर्व सहभागी खेळाडूंना स्पर्धा सहभाग प्रमाणपत्रे वितरीत करण्यात येणार आहे.

# असंघटीत कामगारांच्या विकासासाठी योजना राबवाव्या – जिल्हाधिकारी

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अमरावती :** कामगार विभागातर्फे असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी कार्य करण्यात येत आहे. येत्या काळात कामगार आणि त्यांच्या कुटुंबांसाठी विकासाच्या योजना राबवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात असंघटीत कामगार, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, बाल कामगार कृतीदल समिति व बालकामगार सल्लागार समन्वय समिती, वेठिबगार दक्षता समिती, माथाडी व असंघटीत कामगार यांच्याबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी



अधिकारी विनय ठमके, सहायक कामगार आयुक्त श्रद्धा वाघमारे, सरकारी कामगार अधिकारी श्रीकांत झंवर, कुलदिन भोलाने आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, असंघटीत क्षेत्रात काम करणारा वर्ग हा कमी उत्पन्न असलेला घटक आहे. त्यामुळे त्याला सामाजिक सुरक्षा जास्त प्रमाणात देण्यात यावी. त्यांच्या विकासासाठी असणाऱ्या योजनांमध्ये प्रामुख्याने घरासंदर्भात योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी. कामगारांना त्यांच्यासाठी असलेल्या योजनांमध्ये प्रामुख्याने निवृत्तीनंतर किंवा काम सोडल्यानंतर लाभ द्यावयाचे आहेत. मात्र कामगारांचे कौशल्य विकसित करण्यावरही भर देण्यात यावा. कामगारांची आयुष्मान भारत योजनेत नोंदणी करावी, त्यामुळे त्यांना पाच लाख रूपयांचा प्रत्येक वर्षी आरोग्याचा लाभ मिळू शकेल. बाल व किशोरवयीन कामगार हे प्रामुख्याने विटभट्टीवर आढळून येतात. आतापर्यंत यात २८ जणांबाबत कारवाई करण्यात आली आहे. मेळघाटातील कामगार हे प्रामुख्याने अकोला जिल्ह्यात स्थलांतरीत होतात. त्यामुळे अमरावती आणि अकोला जिल्ह्यांनी संयुक्तपणे कारवाई करावी. कारवाईपश्चात गुन्हा दाखल झाल्यानंतरही या प्रकरणाचा कामगार विभागाने पाठपुरावा करावी. जिल्ह्यात छोटे टेक्सटाईल उद्योगामध्येही बालकामगार असण्याची शक्यता आहे. याठिकाणीही पडताळणी करण्यात यावी, असेही निर्देश श्री. येरेकर यांनी दिले.


# प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट येथे बँकिंग क्षेत्रातील करिअर संधींवर विद्यार्थी–उद्योग संवाद

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अकोला :**

एमबीए विभागाचा उपक्रम

अमरावती : विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी संचलित प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट, अमरावती येथे शैक्षणिक गुणवत्ता व उद्योगाभिमुखता वाढविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव श्री युवराजसिंग चौधरी तसेच कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, श्री पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड व प्रा. गजानन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांच्या प्रेरणेने हे उपक्रम राबविण्यात येत



आहेत.

याच उपक्रमांचा एक भाग म्हणून एमबीए विभागातर्फे 'एच.आर. आपल्या दारी' या घ्ह्रंूब घ्र्हींमूदह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाअंतर्गत विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांचे एच.आर. तज्ज्ञ विद्यार्थ्यांना उद्योगजगताची ओळख, करिअर संधी तसेच आवश्यक कौशल्यांबाबत मार्गदर्शन करतात. या उपक्रमाच्या दुसऱ्या पुष्पाचे उद्घाटन महाविद्यालयात करण्यात आले. यावेळी ॲक्सिस बँकेचे व्हाइस प्रेसिडेंट श्री. प्रसाद ठाकरे यांनी महाविद्यालयास भेट देऊन विद्यार्थ्यांना बँकिंग व कॉर्पोरेट क्षेत्रातील संभाव्य करिअर संधी, भरती प्रक्रिया, अपेक्षित कौशल्ये तसेच व्यावसायिक आचारसंहिता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. एमबीए विभागातर्फे विभागप्रमुख डॉ. शशिकांत थोरात यांनी श्री. प्रसाद ठाकरे यांचे स्वागत केले. कार्यक्रमाला एमबीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत थोरात, डीन – पब्लिक रिलेशन्स डॉ. लोभस घडेकर तसेच प्रा. आतिफ सईद उपस्थित होते. यावेळी श्री. प्रसाद ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या संवादकौशल्य, प्रस्तुतीकरण शैली आणि विषयातील प्रभुत्वाचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कृती ठाकरे व शिखा दुबे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले, तर आभार प्रदर्शन गार्गी चोधरी हिने केले.

## नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी शाळांना दोन दिवस सुट्टी जाहीर

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अमरावती :** नगरपरिषद, नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करिता दि. २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे मतदान केंद्र असणाऱ्या नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील शाळा आणि महाविद्यालयांना दि. १९ आणि २० डिसेंबर रोजी दोन दिवसांची सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी, अचलपूर, वरुड, दर्यापूर, आणि धारणी येथील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीसाठी मतदान केंद्रावर नियुक्त केलेले मतदान अधिकारी, कर्मचारी मतदान साहित्य घेऊन केंद्राचा ताबा घेणार असल्याने दोन दिवसांची सुट्टी असणार आहे, असे आदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जारी केले आहे.

# जिल्ह्याच्या विकासासाठी पायाभूत सुविधा उभाराव्यात – जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**♦ जिल्ह्यातील पर्यटन वाढविण्यावर भर**

**अमरावती :** जिल्ह्यात चिखलदरा हे महत्वाचे पर्यटनस्थळ आहे. प्रामुख्याने नैसर्गिक आणि वन्य प्राणी पाहण्यासाठी जंगल सफारी हे प्रमुख आकर्षण आहे. त्यामुळे याठिकाणी विकासात्मक पायाभूत सुविधा उभाराव्यात, तसेच येथे येणाऱ्या पर्यटकांच्या करमणुकीसाठी साधने उभारल्यास पर्यटक मुक्कामासाठी थांबण्यास मदत होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात आज पायाभूत सुविधा आणि चिखलदरा पर्यटनाबाबत आढावा घेण्यात आला. यात चिखलदरा येथील पर्यटन वाढविण्याच्या दृष्टीने विविध विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती घेण्यात आली.

चिखलदरा येथे सिडकोमार्फत स्कायवॉक उभारण्यात येत आहे. स्कायवॉक उभारणीत अडचणी आल्याने काम पूर्ण करण्यासाठी स्कायवॉकच्या मध्यभागी जमिनीतून आधार देणे आवश्यक आहे. यासाठी तात्पुरता पाया उभारण्यात येणार आहे. गोल रस्त्याचे काम करण्यात येणार असून यात वन विभागाच्या जागेवर तोडगा काढण्यात येणार आहे. याठिकाणी निसर्ग पर्यटनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी सादरीकरण करण्यात आले. चिखलदरा येथेच साहसी खेळाची अकॅडमी उभारण्यात येणार आहे. यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. तसेच कोलकास येथे कोरकू यांच्या जीवनावर आधारीत केंद्र उभारण्यात येणार आहे. चिखलदरा येथे येणारा पर्यटक याठिकाणी थांबावा, यासाठी लाईट इफेक्ट गार्डनची सूचना करण्यात आली. मात्र याठिकाणी वन्य प्राण्यांचा वावर असल्याने ही बाब तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या. गाविलगड किल्ल्याचा विकास पुरातत्व विभागाच्या सल्ल्यानुसार करावा. आमझरी हे मधाचे गाव म्हणून विकसित करण्यात येत आहे. त्यामुळे येथे प्रशिक्षण आणि इतर सुविधा उभारण्यात याव्यात. यासोबतच मेळघाटातील २२ गावांमध्ये वीज पोहोचण्यासाठी वनविभागाच्या सर्व परवानगी घ्यावी. पीएम मित्रा पार्कमध्ये विज उपकेंद्रासाठी जागा मिळणार आहे. त्यानुसार नियोजन करण्यात येणार आहे. मोर्शी आणि वरूड भागासाठी संत्रा प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यात यावी. याठिकाणी कार्यरत जैन आणि एमकेसी यांच्यासोबत समन्वय राखण्यात येणार आहे.



# १७ हजार मतदार ठरविणार चार नगरसेवक

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**♦ चार प्रभागांसाठी १८ मतदान केंद्र**

**खामगांव :** शहरातील चार प्रभागांतील पोटनिवडणुकीसाठी येत्या शनिवारी मतदान होत असून, तब्बल १७ हजारांहून अधिक मतदार चार नगरसेवकांची निवड करणार आहेत. या निवडणुकीत दहा उमेदवार रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे.

चार जागांचे मतदान पार पडताच रविवार, २१ डिसेंबर रोजी खामगाव नगरपालिकेच्या सर्वच ३५ आणि नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीची मतमोजणी पार पडणार आहे. निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा म्हणून चार जागांसाठी वापरण्यात येणारी मतदान यंत्रे मंगळवारी सकाळी ११ वाजता अधिकृतपणे सील करण्यात आली. चार प्रभागां साठी एकूण १८ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून, तितकीच मतदान यंत्रे वापरण्यात येणार आहेत. संभाव्य तांत्रिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर चार मतदान यंत्रे राखीव ठेवण्यात आली आहेत. संपूर्ण निवडणूक यंत्रणेच्या देखरेखीखाली पारदर्शक पद्धतीने पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांच्या उपस्थितीत प्रशासकीय इमारतीलगत असलेल्या महात्मा गांधी सभागृहात मतदान यंत्रांची तपासणी करून सीलिंग करण्यात आली. यावेळी निवडणूक लढविणारे सर्व दहा उमेदवार व त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वांच्या समक्ष पारदर्शक प्रक्रिया यावेळी राबविण्यात आली.

# जागतिक दिव्यांग दिनाचा कार्यक्रम साजरा

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**खामगाव :** जागतिक अपंग दिवसाचे औचित्य साधत दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विराट मल्टिपर्पज फाउंडेशन खामगाव च्या वतीने जागतिक अपंग दिवस साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्षपदी लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे महाराष्ट्र राज्य संघटक जेष्ठ संपादक जगदीशजी अग्रवाल हे होते तर प्रमुख मुख्य अतिथी म्हणून दिव्यांगत्वावर मात करीत संपूर्ण राज्यात दिव्यांगना वास्तविक दिशा देणाऱ्या प्रा दिशा दींडे तसेच शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित दिव्यांग आंतरराष्ट्रीय खेळाडू बुलढाणा जिल्हा सहाय्य क्रीडा अधिकारी अनुराधा सोळंके खामगाव प्रेस क्लब अध्यक्ष किशोर भोसले, लोक स्वतंत्र पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संभाजीराव टाले विराट मल्टीपर्पज फाउंडेशन अध्यक्ष मनोज नगरनाईक



प्रहार शहराध्यक्ष शत्रुघ्न इंगळे हे होते

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जगदीश अग्रवाल यांनी आपले अध्यक्ष भाषणात सांगितले की अपंग बांधव कुठेही मागे नाही आमच्या शहरात दिव्यांग असूनही काही वकील व डॉक्टर टॉप वरती आहे अनेक क्षेत्रांमध्ये दिव्यांग बांधव उच्च पदावर कार्यरत आहे कोणत्याही क्षेत्रात ते मागे नाही तर दिव्यांग बांधवांना दिशा दिंडे पुणे यांनी मौलिक मार्गदर्शन व आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की अपंग व्यक्तीने स्वतःला कमी न लेखता आपण आपले ध्येय गाठण्यासाठी अविरत प्रयत्नरत राहिले पाहिजे आपण आपल्या मध्ये विविध कलागुण आत्मसात करीत स्वतःसह आपल्या परिवाराचा विकास साध्य कसा होईल यासाठी प्रयत्नशील राहावे त्यांनी सहा देशात वास्तव्य केले याचा अनुभव सुद्धा सांगितला तसेच सध्या संपूर्ण राज्यामध्ये दिव्यांग विकासाकरिता प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय व महाविद्यालय मध्ये भेटी देऊन असलेल्या अडचणी व त्यांच्या समस्या निकाली काढण्याचे कार्य त्या करीत आहे सध्या त्यांनी १८ जिल्ह्यात जवळपास साडेसहा हजार किलोमीटरचा प्रवास व त्याचे वर्णनही त्यांनी यावेळी केले तर आंतरराष्ट्रीय तलवारबाजी खेळाडू बु. जि. क्रीडा सहायक अधिकारी अनुराधा सोळंके यांनी आपल्या मनोगतमध्ये सांगितले की हलाखीची परिस्थिती पासून सुरू केलेला प्रवास प्रचंड इच्छा शक्तीच्या जोरावर क्रीडा क्षेत्रामध्ये आपली छाप उमटवली व आंतरराष्ट्रीय खेळाडू म्हणून ३७ वी रँक प्राप्त केली आहे त्या क्रीडा क्षेत्रामधूनच मला दिव्यांगत्वावर मात करीत असंख्य पुरस्कार पारितोषिके प्राप्त केले आज सरकारच्या माध्यमातून दिव्यांगासह सर्वसामान्य खेळाडू करिता कार्यरत आहे किशोर आप्पा भोसले यांनी विराट मल्टीपर्पज फाउंडेशन च्या वतीनं सातत्याने दिव्यांग बांधवांसाठी जे कार्य केल्या जात आहे ते कार्य अभिमानास्पद आहे संभाजीराव टाले यांनी आपले विचार मांडताना सांगितले की दिव्यांग बांधव कुठे कोणताही रोजगार करून स्वाभिमानाने जीवन जगत आहे तर संस्थेचे अध्यक्ष मनोज नगर नाईक यांनी आपले प्रखर विचार मांडताना सांगितले सरकारने एसटी महामंडळातील शिवाई सह वातनुकुलित बस मध्ये इतर सर्वांना आरक्षण लागू केले आहे परंतु यामध्ये आमच्या दिव्यांग घटकाला मात्र नाही ते का नाही ते दिल्यास गेले पाहिजेत तसेच राज्य सरकारच्या ग्रामविकास मध्ये कर सवलत ५०३ आहे परंतु शहरी भागातील नगर विकास विभागामध्ये सवलत नाही ती शहरी दिव्यांगाना सवलत देण्यात आलीच पाहिजे यासह अनेक मागणी यांसाठी आम्ही आता लढा लढणार आहे यासाठी परिवहन मंत्री व नगर विकास मंत्री यांच्याकडे आम्ही दिव्यांग बांधव पाठपुरावा करून व आपली मागणी शासन दरबारी लावून ती यशस्वीपणे पदरात पाडून घेऊ तर

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा गुरूवारी शुभारंभ

**अकोला:** ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ व माजी सैनिकांचा मेळावा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. आकाशवाणीनजिक माजी सैनिक मुलांचे वसतिगृह येथे होणार आहे. या कार्यक्रमात वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, शौर्यपदकधारक यांचा सत्कार करण्यात येणार आहे. दिवंगत सैनिकांच्या पत्नी यांना मंजूर आर्थिक मदतीच्या धनादेशाचे वितरणही यावेळी होईल.

भारताच्या संरक्षणासाठी प्राणार्पण करणा-या जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करून त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे, तसेच युद्धात अपंगत्व आलेल्या किंवा निवृत्त झालेल्या सैनिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी ध्वजनिधीचा उपयोग केला जातो. यावेळी माजी सैनिक, त्यांचे कुटुंबिय व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मेजर आनंद शरद पाथरकर यांनी केले आहे.

## शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज तत्काळ निकाली काढा

### समाजकल्याण सहायक आयुक्तांचे आवाहन

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अकोला:** अनुसूचित जाती प्रवर्गासाठीच्या शिष्यवृत्ती योजनांचे यावर्षीचे केवळ ५६ टक्के अर्ज महाडीबीटी पोर्टलवर नोंदणीकृत आहेत. महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या मोठ्या प्रमाणात असून, त्यांचे तत्काळ निराकरण करण्याचे आवाहन समाजकल्याण सहायक आयुक्त मारोती वाठ यांनी केले आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती, राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि निर्वाह भत्ता योजना महाडीबीटी पोर्टल या प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहेत. महाविद्यालय स्तरावर सन २०२१-२२ मधील ४२१, सन २०२२-२३ मधील ७०५, सन २०२३-२४ मधील १९९ व सन २०२४-२५ मधील ८१६ अर्ज प्रलंबित आहेत. या अर्जांची तपासणी पडताळणी करून पात्र अर्जावर कार्यवाही करावी. महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात यावे जेणेकरून विद्यार्थी लाभापासून वंचित राहणार नाहीत. सर्व महाविद्यालयांनी गांभीर्याने नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्पर्धा परीक्षार्थ्यांसाठी सुविधा; कौशल्य विकास केंद्रातर्फे विनामूल्य अभ्यासिका

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अकोला:** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे स्पर्धा परीक्षेची तयारी करणा-या विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील प्रशासकीय इमारतीच्या दुस-या माळ्यावर मॉडेल करिअर सेंटर येथे अभ्यासिका सुरू आहे. केंद्र लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग, रेल्वे, पोलीस भरती, बँकिंग यासह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत प्रवेश मिळेल. येथे अभ्यासासाठी शांत व सुसज्ज वातावरण उपलब्ध आहे. गरजू विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी केले.

# पहिल्यांदाच वंचितने दिला ब्राह्मण शहर अध्यक्ष

प्रतिनिधी १७ डिसेंबर

### अकोला शहर पुर्व ची कार्यकारिणी घोषित

**अकोला :** अख्या महाराष्ट्रात वंचित बहुजन आघाडीने पहिल्यांदा ब्राह्मण शहर अध्यक्ष दिला आहे. ज्यांना शहर अध्यक्ष केले त्यांची निश्चितच त्या पदासाठी पात्रता आहे त्याच बरोबर त्यांचे गेल्या वीस वर्षापासूनचे कार्य आणि बाळासाहेब आंबेडकर यांच्याशी आणि त्यांच्या परिवाराशी एकनिष्ठ असल्याचे बक्षीस निलेश देव यांना मिळाले आहे. अकोला पुर्वचे अध्यक्ष पद वंचितने भविष्यातील रणनिती निश्चित करताना केल्याचे चित्र आहे. बाळासाहेब आंबेडकर, प्रा.अंजलीताई आंबेडकर आणि सुजात आंबेडकर यांच्यासह वंचितच्या राज्य कार्यकारणी अध्यक्षांनी दाखविलेला विश्वास सार्थ करण्याचे वचन निलेश देव यांनी दिले आहे. दरम्यान, वंचितने शहर अध्यक्ष पदी ब्राह्मण दिल्याने त्याचा मोठा फटका हा भाजपला बसण्याची चिन्हं आहे. इतकेच नाही तर भाजपने गेल्या दशकात ब्राह्मण समाजाला महत्वाचे पद दिले नसल्याने तशी नाराजी ब्राह्मण समाजात आहे. त्यात वंचितने थेट ब्राह्मण शहर अध्यक्ष करत भाजपला कोडींत पकडले हे मात्र नक्की.

निलेश देव यांचे संगठन कौशल्य, विविध कल्पक योजना आणि लोकांच्या समस्यांना घेऊन महापालिकेत केलेले आंदोलन ही त्यांची जमचे बाजू आहे. इतकेच नाही तर विविध विषयावर त्यांनी केलेले अकोला, मुंबई येथे केलेले उपोषण हे महापालिका कर कमी करण्यासाठी चे आंदोलन, न्यू तापडीया नगर उड्डाणपुलासाठी सकारात्मक पाठपुरावा, पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी केलेली धावपळ, पाणी पट्टीचे अव्वाच्या सव्वा आलेले देयक घटविण्यासाठी यशस्वी पुढाकार या सर्व आंदोलनात्मक पार्श्वभूमीवर नीलेश देव यांची निवड महत्वाची ठरत आहे. माजी नगरसेविका व लोकनेत्या ॲड.धनश्री देव यांचे कोरोनातील निधनानंतर निलेश देव राजकारणात अधिक सक्रिय झाले. वैकुंठ रथ, शवपेटी, रुग्ण सेवा उपकरण बँक, आदिवासींना दिवाळीत मिष्ठान्न कपडे वाटप यांचे यशस्वी आयोजन विशेषतः राजकारण विरहित जनसेवा या त्यांच्या भूमिकेला साजेशे पद बाळासाहेबांनी दिले आहे. निलेश देव या वंचित च्या कार्यकर्त्याला अकोला पुर्वचे अध्यक्ष करत पक्षीय जबाबदारी देण्यात आली. २०१७ मध्ये पाच नगरसेवक वंचितचे महापालिकेत होते. ते यंदा कितीवर नेले जातात याकडे सर्वांचे लक्ष आहे.



वंचित बहुजन आघाडी, अकोला शहर व अकोला महानगर शहर कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. पक्षाचे महासचिव किसन चव्हाण यांनी ही यादी जाहीर केली आहे. यामध्ये निलेश देव यांची अध्यक्षपदी, तर दामोदर जगताप यांची महासचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ज्येष्ठ सल्लागारांमध्ये बालमुकुंद भिरड, ॲड.संतोष रहाटे, शोभाताई मुळे, सरलाताई मेश्राम, शोभा शेळके, मनोहर बनसोड, ॲड.नरेंद्र बेलसरे, ज्योती खिलारे, सुवर्णा जाधव, शंकर इंगोले, देवानंद खडे, बबलू पातोडे, मंगेश बलखंडे, डॉ.गाडगे, निलेश पवार, आशिष सोनोने, सुगत तायडे आदींचा समावेश आहे.

### ब्राह्मण विरोधात ब्राह्मण

◆ विजयी पार्श्वभूमी पाहता वंचितने गेल्या निवडणुकीत प्रभाग ३ मधून अ?ॅड.धनश्री देव यांना तिकिट दिले. त्यावेळी भाजपने जाणीवपुर्वक स्मिता धनंजय गिरिधर यांना उमेदवारी दिली. धनश्री देव या आठशे मतांनी विजयी झाल्या. वंचितने ब्राह्मण उमेदवार दिल्यानंतर भाजपने मराठा उमेदवार का दिला नाही. ब्राह्मणांचे खच्चीकरण भाजपने केल्याचा आरोप त्यानंतर व्हायला लागला. इतकेच नाही तर बंडू पंचभाई नंतर पक्षाचे सरचिटणीस पद आता कारकुन झाले असून पक्षातील वरिष्ठ पदावर ब्राह्मण समाजाला प्रतिनिधित्व नसल्याचे चित्र आहे. इतकेच नाही तर प्रतुल हातवळणे, गिरिश गोखले यांनी विधानसभा निवडणुक पुर्व घेतलेल्या पत्रकार परिषदेत ब्राह्मण असल्याने उपेक्षित ठेवले जात असल्याचा आरोप केला होता. एकीकडे ब्राह्मण विरोधात ब्राह्मण तिकिट देत स्वपक्षीयांना पाडण्याचा उद्योग केला जात असताना आता भटांचा पक्ष ही भाजपची ओळख आता पुसण्यात स्थानिकांना मात्र यश आले आहे हे मात्र नक्की.

# अकोट रा.काँ.च्या रास्ता रोकोचा धसका, मागण्या मान्य


प्रतिनिधी १७ डिसेंबर



**अकोट:** अकोट तालुक्यातील रंभापुर फाटा ते अकोट या मार्गाचे काम संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे चालु आहे.दोन्ही साईडा खोदुन ठेवल्याने वाहतुकीस अडथळा येत होता.हे काम जलदगतीने करण्यासाठीच्या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वतीने सावरा फाटा येथे १२ डिसें.ला रास्ता रोको आंदोलन छेडण्यात आले..याचा धसका घेत संबधित विभागाचे अधिकरी व ठेकेदार हे सावरा फाटा येथे येऊन त्यांनी संबंधीत मागण्या मान्य करण्याचे लेखी आश्वासन दिले.

ह्या रोडचे काम करण्यासाठी दोन्ही साईड खोदलेल्या आहेत.त्यावर पाणी मारण्याचे प्रमाण कमी असल्याने मोठ्या प्रमाणात धुळ उडत होती.त्यामुळे कीरकोळ अपघातही झाले.व हीच धुळ रोडलगत असलेल्या शेतातील पीकावर उडत असल्याने शेतमालाचेही नुकसान होत आहे.त्यामुळे खोदकामावर एक तासातुन पाणी मारण्यासाठी टंकरची तत्काळ वाढ करण्यात आली.व कामाची गतीही वाढवण्यात येईल असे लेखी आश्वासन संबधीत विभागाने दिले..तसेच दुसरी मागणी सी.सी.आय ने शेतकऱ्यांचा कापुस खरेदीचे प्रमाण वाढवण्याची मागणी करण्यात आली.हा मुद्दा पक्षाचे युवा आ.रोहीत पवार यांनी हिवाळी अधिवेशनात लावुन धरली व ती मान्यही करण्यात आली.हे रास्ता रोको आंदोलन जिल्हाध्यक्ष संग्राम भैय्या गावंडे यांच्या आदेशानुसार व अकोट विधानसभा अध्यक्ष नानासाहेब हिंगणकर यांचे मार्गदर्शनात करण्यात आला.यावेळी परीसरातील शेतकरी, वाहनचालक,तथा अटो युनीयन सावरा,व रा.का.पक्षाचे पदाधिकारी शहर अध्यक्ष नवनितजी लखोटीया,जेष्ठ सदस्य रामदास मंगळे,नागेश आग्रे, समर्थ अवारे,मनीष तळोकार, नरेंद्र कोंडे,देवेश चौधरी,हरीदास दहीभात,अक्षय चौधरी, पद्माकर चौधरी,अमोल मोहोड इ सह शेतकरी श्रीकृष्ण चव्हाण, संदीप शीरस्कार,अतुल कळस्कार, अक्षय चौधरी,अनंता चौधरी,छोटुभाऊ गीते,दीपक बोंडे,छोटुभाऊ चौधरी,संजय चौधरी, निलेश नागे,सागर चौधरी, दीपक बोंडे,प्रदीप पायघन सोनु पागधुने,रमेश सपकाळ, सुनील सपकाळ, शंकरराव विधोळ, अनीस आली, प्रकाश राऊत,संघपाल धांडे, व कार्यकर्ते बहुसंख्येने हजर होते.या आदोलनाचे आयोजन तालुकाध्यक्ष श्रियश शंकरराव चौधरी यांनी केले.यावेळी सुत्रसंचलन समर्थ आवारे यांनी तर प्रास्ताविक नागेश आग्रे यांनी तर आभारप्रदर्शन मनीष तळोकार यांनी केले. आदोलनस्थळी अकोट ग्रामीण पो.स्टे चे ठाणेदार किशोर जुनघरे यांचे मार्गदर्शनात सचिन कुलट यांनी सकाळपासून बंदोबस्त ठेवला होता.

# संत गाडगे महाराज मंदिरात शिव महापुराण कथा



प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अकोट:** गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला हे ब्रीदवाक्य श्री संत गाडगे महाराज यांना नेहमीच संबोधित करून उच्चारला जाते. पणज येथील संत गाडगे महाराज मंदिरात १३ डिसेंबर पासून विविध कार्यक्रम सुरू झाले आहे. २० पर्यंत काकडा सकाळी ४ ते ५ दुपारी २ ते ५ शिव महापुराण कथा, हरिपाठ सायंकाळी ६ ते ७ पर्यंत रात्री ८ ते १० किर्तन.

संगीतमय शिव महापुराण कथेचे वाचक ह भ प नागेश महाराज आगलावे आहेत. १३ ला हभप केशव महाराज मोरे म्हैसपूर रात्री, १४ ला हभप दादा महाराज पाटील बुलढाणा, सोमवारी हभप श्रद्धा अतुल बोराखडे जळगाव जामोद, मंगळवारी अरुण महाराज लांडे यांचे कीर्तन झाले. बुधवारी हभप भौय्यूजी महाराज भुसावळ रात्री ८ ते १०, गुरुवारी हभप कन्हैया महाराज भुसावळ रात्री ८ ते १०, शुक्रवारी हभप वाल्मिक महाराज सुरायकर रात्री ८ ते १०, काल्याचे कीर्तन व महाप्रसाद शुक्रवार दि. २० ह भ प वाल्मिक महाराज सुरायकर मुक्ताईनगर हे करतील, वेळ दुपारी १२ ते १., २० रोजी भारुड रोहन महाराज, भारुळकार कारंजा लाड, हे करतील. यावेळी गायनचार्य निवृत्ती महाराज शेलार, सोपान काका शेलार वणी वरुळा, मृदुंगाचार्य वैभव महाराज अस्वार पणजकर, भागवत संच परमेश्वर महाराज आगलावे, तबलावादक नितीन महाराज इंगळे, ऑर्गन सागर महाराज कोथळकर, ऑक्टो पॅड शिवा महाराज पुरी, या कथा सप्ताह साठी प्रमोद झंजाट, विजय धुमाळे, स्व.ज्योतीताई राजूभाऊ बोचे, विनोद गिरी, मनोहर राठोड, सौ. ज्योतीताई वाघमारे, संध्या दिनकर राऊत, विजय देशमुख, दत्ता गिरी, विवेक गवळी, अविनाश अघडते व मित्र मंडळ पणज यांच्या माध्यमातून अन्नदान करण्यात आले. कथा सप्ताहाचे आयोजक श्री संत गाडगेबाबा भागवत समिती व समस्त गावकरी मंडळी यांनी केले. पंचक्रोशी मधील सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमांमध्ये भागवत सप्ताह व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# शेगाव अकोट महामार्गावरील झालेल्या अपघातातील दोघांचा मृत्यू

प्रतिनिधी १७ डिसेंबर

### ◆ लोहारा परिसरात हळहळ

**हातरूण:** लोहारा येथील ग्रामपंचायत पाणीपुरवठा कर्मचारी हसीन देशमुख आणि शकील हमजा देशमुख दोघेजण आपल्या दुचाकी वाहनाने शेगांव कडे जात असतांना शेगांव अकोट रोडवरील नायरा पेट्रोल पंपासमोर चारचाकी वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार शकील हमजा देशमुखचा जागीच मृत्यू झाला होता, तर दुचाकीवरील हसीन देशमुख गंभीर जखमी झाल्याची घटना रविवार, १५ डिसेंबर रोजी दुपारी १२:३० वाजताच्या सुमारास घडली होती. हसीन रब्बानी देशमुख गंभीर जखमी झाल्याने त्यांना अकोला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले होते त्यांची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्यांना खाजगी दवाखान्यात हलविण्यात आले तिथे आज डॉक्ट्रांनी त्यांना मृत्यू घोषित केले मृत्यूची बातमी मिळताच लोहारा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



अकोट रोडवरील नायरा पेट्रोल पंपासमोर मागून आलेल्या (एम. एच. ५६ ए-२०३६) क्रमांकाच्या चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात शकील हमजा देशमुख यांना गंभीर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. तर, मागे बसलेले हसीन रब्बानी देशमुख हे गंभीर जखमी झाले होते , या अपघाताच्या घटनेत चारचाकी इको वाहनाचे एका चाकाचे टायर फुटले मात्र तरीही वाहन चालकाने घटनास्थळ पासून शेगाव उडाणपूलपर्यंत वाहन चालवत नेले आणी उडाणपूल जवळ इको वाहन सोडून तो पडून गेला ही घटना शेगाव पोलीस ठाण्या हद्दीत येत असून शेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून, पुढील कारवाई सुरु केली आहे.

## एलएलबी परीक्षेत सायली पुंडकर यांना विद्यापीठाचे सुवर्ण पदक

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अकोला:** सामाजिक , राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत ॲड. भारतीताई पुंडकर यांची कन्या सायली अनिल पुंडकर हिने एल एल बी ३ वर्षीय अभ्यासक्रमात संत गाडगे बाबा विद्यापीठ अमरावती मधून गोल्ड सुवर्ण पदक प्राप्त केले. तिच्या यशा बद्दल अभिनंदन होत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616

बातम्यासाठी संपर्क 9075012801

# प्रभा प्रकाशचे चिमुकले बाल हक्क जनजागृती साठी तिक्ष्णगत महोत्सवात




प्रतिनिधी १७ डिसेंबर

**आलेगाव:** येथील जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट सामाजिक कार्यात अग्रसर असते. मुलांमध्ये समाजाबद्दल आपुलकी निर्माण व्हावी यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवत असते. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हक्क बद्दल जाणून घेणे किती आवश्यक आहे. या अनुषंगाने प्रभा प्रकाशचे चिमुकले तीक्ष्णगत फौंडेशन अकोला द्वारा आयोजित वाकेथॉन बाल हक्क जनजागृती मध्ये सहभागी झाले.

बाल हक्क संरक्षण, बाल कल्याण व बाल कामगार प्रतिबंध या सामाजिक उद्दिष्टासाठी आयोजित वॉकेथॉन बाजोरिया मैदानातून सुरु झाले. यामध्ये वेगवेगळ्या झाकी तयार करण्यात आल्या. प्रभा प्रकाश आणि नूतन विद्यालयाने बनविलेल्या झाकी सर्वांचे आकर्षण ठरल्या. समारोप शास्त्री स्टेडियम वर करण्यात आला. वॉकेथॉन मध्ये मराठी अभिनेता अंकुश चौधरी आणि महाराष्ट्राची हास्य जत्राचे सुपरस्टार गौरव मोरे, संजय सेंगर, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक सुद्धा उपस्थित होते. तीक्ष्णगत द्वारा विद्यार्थ्यांसाठी रंगाभरण स्पर्धा आणि पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचा निकाल तीक्ष्णगत महोत्सव समारोप दिनाला जाहीर करण्यात येणार आहे.

# महानगरपालिकेमार्फत शहरात लसीकरणासाठी सिटी टास्क फोर्सची बैठक संपन्न

प्रतिनिधी १७ डिसेंबर




**अकोला:** आज दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी, महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने शहरातील लसीकरण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात सिटी टास्क फोर्सची बैठक संपन्न झाली आहे. या बैठकीत, गरोदर मातांचे लसीकरण, बालकांचे नियमित लसीकरण तसेच राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला, तसेच शहरातील लसीकरण कव्हरेज वाढविण्यासाठी उच्च जोखीम क्षेत्रे, स्थलांतरित व वंचित घटक यांच्यावर विशेष लक्ष देण्याबाबत चर्चा करण्यात आली. लसीकरणापासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये यासाठी सूक्ष्म नियोजन, क्षेत्रस्तरीय देखरेख, जनजागृती व आंतरविभागीय समन्वय अधिक बळकट करण्याचे निर्देश यावेळी मनपा आयुक्त डॉ.लहाने यांनी दिले.

बैठकीदरम्यान विविध विभागांनी आपापल्या स्तरावर समन्वयाने काम करून लसीकरण मोहिमा यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच नियोजित कालावधीत उद्दिष्टपूर्ती करण्यावर भर देण्यात आला.

सदर बैठकीस वैद्यकीय आरोग्य अधिकारी, माता व बालसंगोपन अधिकारी वैद्यकीय अधिकारी, शहर कार्यक्रम व्यवस्थापक सार्वजनीक आरोग्य व्यवस्थापक, सार्वजनिक आरोग्य परिचारिका, लसीकरण क्षेत्र संनियंत्रक, औषध निर्माता, एकात्मिक बाल विकास सेवा (घ्ज्ञ्ए), शिक्षण विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्रतिनिधी, जिल्हा महिला रुग्णालय प्रतिनिधी, खाजगी डॉक्टर संघटने अंतर्गत फॉगसी व आयएपी संघटनेचे पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५

# विदर्भ विभागीय कार्यकारी अध्यक्षपदी संजय पळसकर

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**उमरखेड** : अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या विदर्भ विभागीय कार्यकारी अध्यक्षपदी संजय पळसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संजय पळसकर हे येथील राजकीय व सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वातंत्र्य सेनानी प्रदीप पाटील खंडापूरकर (बाबा)



यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल दादा देसले यांनी संजय पळसकर यांच्यावर विदर्भ विभागीय कार्यकारी अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली.

नवनियुक्त अध्यक्ष संजय पळसकर यांनी समितीने सोपविलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडून भ्रष्टाचारमुक्त समाज घडविण्यासाठी अ. भा. भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या माध्यमातून कार्य करण्याची ग्वाही दिली आहे.

# दीड हजार लोकांच्या गावात 27 हजार बनावट जन्म-नोंदी

## शेंदुरसनी ग्रामपंचायतीच्या सीआरएसमध्ये बनावट नोंद; सायबर फसवणुकीचा धक्कादायक प्रकार

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**यवतमाळ** : जिल्ह्यातील आर्णी तुलुक्यातील शेंदुरसनी ग्रामपंचायतीच्या जन्म-मृत्यू नोंदणी प्रणालीत भयंकर सायबर फसवणुकीचा प्रकार उघड झाला आहे. गावाची लोकसंख्या फक्त १५००, तरीही २७,३९८ जन्म व ११ मृत्यू नोंदी सीआरएस (सिव्हिल रजिस्ट्रेशन सिस्टिम) सॉफ्टवेअरमध्ये नोंदवलेल्या आढळल्या.




महाराष्ट्र शासनाच्या अवैध व विलंबित नोंदी रद्द करण्याच्या निर्णयाच्या अंमलबजावणीदरम्यान हा घोटाळा उघड झाला. जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा निबंधक (जन्म-मृत्यू) यांनी हा प्रकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यासमोर आणला. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने गावात भेट देऊन सखोल चौकशी केली, त्यात २७,३९७ जन्म आणि ७ मृत्यू नोंदी गावाबाहेरील व पूर्णपणे बनावट असल्याचे निष्पन्न झाले.

तांत्रिक तपासणीसाठी ही नोंदी उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ), पुणे कडे पाठवण्यात आल्या. राज्य लॉगिनद्वारे तपास करताना शेंदुरसनी ग्रामपंचायतीचा सीआरएस आयडी मुंबई येथे मॅप झाल्याचे आढळले. पुढील तपास दिल्लीतील अतिरिक्त रजिस्ट्रार जनरल आणि राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र (एनआयसी) यांच्याकडे वर्ग करण्यात आला.

११ डिसेंबर २०२५ रोजी अतिरिक्त रजिस्ट्रार जनरल कार्यालयाने या नोंदी सायबर फसवणुकीच्या कक्षेत येण्याची शक्यता व्यक्त केली. त्यानंतर यवतमाळ सिटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिस तपास सुरु आहे.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, ग्रामीण भागातील आयडीचा गैरवापर करून सायबर गुन्हेगारांनी बनावट नोंदी तयार केल्या आहेत. यामुळे आधार कार्ड, मतदार यादी किंवा इतर सरकारी योजनांमध्ये गैरफायदा होण्याची शक्यता आहे.

जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी सर्व निबंधकांना सीआरएस आयडी, पासवर्ड व ओटीपी कोणालाही न द्यावे तसेच संशयास्पद बाब त्वरित जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना कळवावी, असे आवाहन केले आहे.

# महागाव कृषी बाजार समितीवर शेतकऱ्यांची धडक

## हमीभावासाठी आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**महागाव** : महागाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयासमोर राष्ट्रीय किसान मोर्चाच्या वतीने शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन करून तात्काळ उत्पादन खर्चापेक्षा जास्त हमीभाव, शासकीय खरेदी केंद्र सुरू करण्याची आणि भावापेक्षा कमी दर मिळाल्यास व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. या आंदोलनाला लहुजी क्रांती मोर्चाचे जाहीर समर्थन मिळाले.

या आंदोलनात सहभागी शेतकऱ्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना योग्य हमीभाव मिळाल्यास स्वाभिमानाने जीवन जगणे शक्य होईल, कर्जाच्या विळख्यातून सुटका होईल व आत्महत्येसारख्या टोकाच्या निर्णयाला संधी मिळणार नाही. मात्र सध्या बियाणे, खते, औषधे व मजुरीचे दर प्रचंड वाढलेले, परंतु शेतमालाला योग्य




भाव मिळत नसल्याने शेतकरी प्रचंड अडचणीत सापडला आहे. त्यातच अतिवृष्टी, अवर्षण आणि जंगली प्राण्यांचा उपद्रव शेती करणे अधिक कठीण करत आहे. ष्ट्रीय किसान मोर्चाने सहा टप्प्यांचे चरणबद्ध आंदोलन सुरू केले असून पुढील आंदोलनाची रूपरेषा अशी आहे. १५ जानेवारी : आमदार घेराव, ३० जानेवारी : राज्यस्तरीय जेलभरो आंदोलन, २० फेब्रुवारी : मुख्यमंत्री हटाव व मंत्रालय घेराव करण्यात येणार आहे. मुख्य मागण्यांमध्ये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियम 1963 व 1967 मधील नियमांची तात्काळ अंमलबजावणी, कापूस व सोयाबीन दरांचा तात्काळ निर्णय, भावांतर फरकाची रक्कम तात्काळ देणे, तसेच रब्बी हंगामात २४ तास वीजपुरवठा सुनिश्चित करणे यांचा समावेश आहे.


शेतकरी नेते दीपक इंगळे, मनीष जाधव, किसान मोर्चाचे इतर कार्यकर्ते म्हणाले, “हमीभाव हा अधिकार आहे, भीक नाही! शेतकरी आत्महत्या थांबवायच्या असतील तर सरकारने तात्काळ निर्णय घ्यायलाच हवा!” या आंदोलनात राष्ट्रीय किसान मोर्चा, भारत मुक्ती मोर्चा, लहुजी क्रांती मोर्चा तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी सहभागी झाले.

# पाच शेतकऱ्यांच्या विहिरीवरील मोटार केबल लंपास

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**पांढरकवडा** : तालुक्यातील रूंझा परिसरात केबलचोरांनी एकाच रात्री धुमाकूळ घालत पाच शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरींवर बसवलेल्या मोटार पंपाच्या केबल कापून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. सकाळी शेतकरी ओलितासाठी शेतात गेले असता चोरीचा प्रकार त्यांच्या लक्षात आला.

ही चोरी रूंझा ते वाठोडा मार्गावरील शेतशिवारात घडली असून, अज्ञात चोरट्यांनी संधी साधत शेतातील विद्युत केबल कापून नेल्या. वन्य प्राण्यांच्या भीतीमुळे रात्री शेतात कोणीही नसल्याचा फायदा चोरटे घेत असल्याचे परिसरातील शेतकऱ्यांनी



सांगितले.

या प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी पांढरकवडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पुढील तपास सुरू आहे. मात्र, सातत्याने होत असलेल्या केबल चोरीमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

नापिकी, अतिवृष्टी आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी आधीच अडचणीत सापडले असताना, आता शेतातील साहित्य चोरीला जात असल्याने त्यांच्यावर दुहेरी संकट ओढावले आहे. केबल चोरी करणाऱ्या टोळ्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# वाळू माफियांच्या मुसक्या आवळणार

## अवैध उत्खनन रोखण्यासाठी संयुक्त कारवाईचे कडक आदेश

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**पांढरकवडा** : केळापूर उपविभागात वाळू व इतर गौण खनिजांच्या अवैध उत्खनन, वाहतूक आणि तस्करीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. यासाठी महसूल व पोलीस यंत्रणांनी संयुक्तपणे समन्वय साधत विशेष मोहिमा राबविण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर केळापूर येथे वाळू नियंत्रण समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. ही बैठक सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अमित रंजन (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बंसल (भा.पु.से.) यांच्यासह केळापूर, घाटंजी व झरीजामणीचे तहसीलदार, पांढरकवडा, पारवा, घाटंजी, पाटण व मुकुटबन पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक, नायब तहसीलदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत अवैध वाळू उत्खननामुळे नदीपात्रांचे होणारे नुकसान, पर्यावरणीय असमतोल आणि कायदा-सुव्यवस्थेवर होणारे दुष्परिणाम यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या समस्येवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी महसूल व पोलीस विभागाने संयुक्त पथके स्थापन करून नियमित व अचानक कारवाया करण्याचा निर्णय घेण्यात आला. कारवाईदरम्यान करण्यात येणाऱ्या प्रत्येक जप्ती व कार्यवाहीचा पंचनामा करून २४ तासांच्या आत वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करून थेट गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले. अवैध उत्खननात सहभागी असलेले वॉचर्स तसेच इतर जबाबदार व्यक्तींवरही फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे. विना वाहन क्रमांक किंवा बेकायदेशीरपणे वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तात्काळ जप्ती व गुन्हे नोंदविले जातील. शासनाच्या ११ मे २०२५ च्या



परिपत्रकानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, भारतीय न्याय संहिता (BSS) २०२३, पर्यावरण संरक्षण अधिनियम तसेच खाण व खनिज अधिनियम, १९५८ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे. याशिवाय, वाळू तस्करांच्या विघातक कृत्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिनियम १९८१ अन्वये स्थानबद्धतेची (तडीपार) कारवाई करण्याबाबतही निर्णय घेण्यात आला. प्रशासनाच्या या आक्रमक भूमिकेमुळे केळापूर उपविभागात अवैध वाळू तस्करीला मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# थंडीच्या कडाक्यात माणुसकीचा उबदार स्पर्श

## उमरखेडमध्ये २०० हून अधिक कुटुंबांना राहत किटचे वाटप

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**उमरखेड** : इंटरनॅशनल आयकॉन पुरस्कार व ISO मानांकन प्राप्त जिव्हाळा संस्था, उमरखेड यांनी गुंज संस्था, दिल्लीच्या सहकार्याने उमरखेड येथे हिवाळ्याच्या कडाक्यापासून संरक्षण करण्यासाठी २०० हून अधिक गरजवंत कुटुंबांना राहत किट वाटप केले. हा उपक्रम बांधकाम कारागीर, श्रमिक महिला व दिव्यांग व्यक्तींना मदत करण्यासाठी आयोजित करण्यात आला. राहत किटमध्ये कपडे, बूट-चप्पल, सतरंजी, भांडी, ताडपत्री आणि गृहउपयोगी साहित्य यांचा समावेश होता.

या उपक्रमामुळे थंडीच्या दिवसांत उपेक्षित कुटुंबांना दिलासा मिळाला आणि त्यांच्या जीवनात उबदारपणा व आधार निर्माण झाला. जिव्हाळा संस्थेचे अध्यक्ष अतुल मादावार म्हणाले, “जिव्हाळा संस्था म्हणजे फक्त संस्था नाही, तर माणुसकीची



चळवळ आहे.

आज वाटप केलेले राहत किट हे फक्त साहित्य नाही, तर जिव्हाळ्याची ऊब, आधाराची भावना आणि आशेचा प्रकाश आहे.

समाजातील शेवटच्या टोकावर उभ्या व्यक्तीपर्यंत मदतीचा हात पोहोचवणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे हेच आमचे खरे यश आहे.”

कार्यक्रमात संस्थेचे मार्गदर्शक रामराव मादावार, सल्लागार चंद्रकांत खेवलकर, संगीतां मादावार (मांजरे), स्वयंसेवक रवी रामधनी, श्रीकांत शहा, विलास जंगले, आशिष मेश्रे, दुर्गाजी जंगले, दीपक जंगले, दिनेश चव्हाण, मोहन गायकवाड यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# आश्रमशाळा फुलवाडीचा रौप्य महोत्सव; माजी विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**पुसद** : ज्ञानोपासक शिक्षण प्रसारक मंडळ, फुलवाडी संचलित स्व. अप्पासाहेब अत्रे विजाभज आश्रम शाळा फुलवाडी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्राथमिक शाळा, लक्ष्मीनगर, पुसद यांचा रौप्य महोत्सव सांगता समारंभ, माजी विद्यार्थ्यांचा सत्कार आणि संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिपक चव्हाण यांचा सेवापूर्ती सोहळा आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नाईक फाऊंडेशनच्या अध्यक्षा मोहिनी नाईक, प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव राजेंद्र चव्हाण, फुलवाडीचे सरपंच विमल तुकाराम राठोड, ज्ञानोपासक शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य निर्मला चव्हाण, वंदना




चव्हाण, निलिमा राठोड, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी बी. पी. राठोड आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी शाळेत प्राथमिक शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिपक चव्हाण यांना कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आर्वी येथून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल सेवापूर्तीचा सत्कार मोहिनी नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. उद्घाटन भाषणात अध्यक्षा मोहिनी नाईक यांनी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करत दोन्ही शाळांच्या २५ वर्षांच्या कार्याचा गौरव व्यक्त केला. शैक्षणिक व क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे कौतुक केले. त्यांनी भविष्यात शाळांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. संस्थेचे सचिव राजेंद्र चव्हाण यांनी शाळेच्या २५ वर्षांच्या सेवाकार्याचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. कार्यक्रमाचे संचलन शाळेतील विद्यार्थ्यांनी सपना वाहुळे, रेश्मा कोल्हे व गजानन पाचकोरे यांनी केले.

तर कार्यक्रमाचे यश शिक्षक व कर्मचारी यांच्या परिश्रमांमुळे साध्य झाले. या प्रसंगी पालकांची उपस्थितीही लक्षवेधी होती.

# पतंग उडवताना सावधान!; वीजवाहिन्यांपासून दूर रहा

## महावितरणचे नागरिकांना आवाहन

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**यवतमाळ** : पतंग उडविण्याचा आनंद घेताना क्षणभराची बेफिकिरी जीवघेणी ठरू शकते. पतंग उडविताना तसेच कटलेल्या पतंगाचा पाठलाग करताना उच्च व लघुदाबाच्या वीजवाहिन्या, फिडर व इतर वीज यंत्रणांपासून सुरक्षित अंतर राखावे व विद्युत सुरक्षिततेचे नियम पाळावेत, असे आवाहन महावितरणच्या अमरावती परिमंडळाकडून करण्यात आले आहे.

शहरी व ग्रामीण भागात सर्वत्र वीज वितरणाच्या उच्च व लघुदाबाच्या वाहिन्यांचे जाळे पसरलेले आहे. अनेक वेळा पतंग



उडविताना किंवा कटलेला पतंग वीजेच्या तारा अथवा खांबावर अडकल्यानंतर तो काढण्यासाठी काठ्या, लोखंडी सळी किंवा दगडांचा वापर केला जातो. अशा वेळी जिवंत विद्युत तारेला स्पर्श होऊन गंभीर अपघात होण्याची दाट शक्यता असते.

अनेकदा अडकलेल्या पतंगाचा मांजा जमिनीवर लोंबकळत असतो. हा मांजा ओढून पतंग काढण्याच्या प्रयत्नात भीषण विद्युत अपघात घडू शकतो. शिवाय मांजा ओढताना एका तारेचा दुसऱ्या तारेसोबत घर्षण होऊन शॉर्टसर्किटमुळे प्राणघातक दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे नागरिकांनी व विशेषतः लहान मुलांनी वीजवाहिन्या व वीज यंत्रणा असलेल्या परिसराऐवजी सुरक्षित व मोकळ्या मैदानातच पतंगोत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### धातुमिश्रित मांजा ठरतोय धोकादायक

सध्या बाजारात धातुमिश्रित मांजा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. या मांजावर धातुमिश्रित रसायनाचे कोटिंग केलेले असल्याने त्यातून वीज प्रवाह सहज संचारू शकतो. असा मांजा वीजवाहिन्यांना अडकल्यास विद्युत यंत्रणेमध्ये बिघाड होऊन संबंधित भागातील वीजपुरवठा खंडित होण्यासह गंभीर अपघात होण्याचीही शक्यता असते. पतंगोत्सव आनंदात साजरा करा, मात्र सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्या, असे आवाहन महावितरणने केले आहे.

### पालकांनी दक्ष राहावे

पालकांनी विशेष दक्षता घेऊन लहान मुलांना सुरक्षितरीत्या पतंग उडविण्याबाबत मार्गदर्शन करावे. वीज प्रवाह असलेल्या यंत्रणांपासून दूर राहूनच पतंगोत्सव साजरा करण्याबाबत आग्रही रहावे. पतंग उडविताना झालेल्या अपघातांमध्ये अनेक दुर्दैवी घटना घडल्या असून घाटंजी येथील घटना अद्याप ताजी आहे. वीज प्रवाहाच्या संपर्कात आल्याने तेरा वर्षीय मुलाला आपला एक हात कायमचा गमवावा लागला. त्यामुळे सावधगिरी हीच खरी सुरक्षा असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

# शेतकऱ्यांसाठी 'महाविस्तार एआय' ॲप

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**यवतमाळ** : कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित 'महाविस्तार एआय' मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांचे जीवनमान अधिक सुलभ करणे आणि शेती अधिक फायदेशीर बनविणे हा आहे.

महाविस्तार एआय ॲप शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी पेरणी पद्धती, खतांचा वापर, पाणी व्यवस्थापन, पीक संरक्षण, कीड व रोग नियंत्रण, हवामान अंदाज, राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील बाजारभाव, तसेच कृषी विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती आणि अर्ज प्रक्रियेची सोय उपलब्ध करून देईल. या ॲपद्वारे शेतकरी इतर शेतकऱ्यांशी व कृषीतज्ज्ञांशी संपर्क साधू शकतील, जेणेकरून त्यांना योग्य निर्णय घेता येतील आणि शेती उत्पादनात वाढ होईल. या माध्यमातून शेतकरी समुदाय निर्माण करण्याचे उद्दीष्ट साधले जाणार आहे.

उपविभागीय कृषि अधिकारी जे. आर. राठोड यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की, “महाविस्तार एआय हे शेतकऱ्यांसाठी डिजिटल क्रांती असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा.”

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

बुधवार दि. १७ डिसेंबर २०२५

सुविधा अनेक,
झाले चेक,
कारभार नेक,
९ व्यांदा नंबर एक


५ मंगळवार दि. २० फेब्रुवारी २०२४ सिटी न्यूज सुपरफास्ट
रूग्णालयाचा 'स्वच्छ' कारभार आरोग्याचा झाला 'सुधार' नियमबाह्य कामे 'हद्दपार'!
*नव्या संकल्पाचा, नवा विचार * जिल्हा शल्यचिकीत्सकांचा पुढाकार

५ रविवार दि. २८ जुलै २०२४ सिटी न्यूज सुपरफास्ट
नव्या संकल्पाचा नवा विचार, रूग्णालयाचा बदलला कारभार, नियमबाह्य कामे हद्दपार, कायमस्वरूपी बंद भ्रष्टाचार, आरोग्यात झाला सुधार, जिल्हा शल्यचिकीत्सकाचा पुढकार
आता खासगी सुविधा विसरा, आरोग्य सेवेत जिल्हा रूग्णालय, वाशीम राज्यात दुसरा!

सोमवार दि. १४ ऑक्टोबर २०२४ सिटी न्यूज सुपरफास्ट
नव्या संकल्पाचा नवा विचार, रूग्णालयाचा बदलला कारभार, नियमबाह्य कामे हद्दपार, कायमस्वरूपी बंद भ्रष्टाचार, आरोग्यात झाला सुधार, जिल्हा शल्यचिकीत्सकाचा पुढकार
आरोग्य सुविधा अनेक, जिल्हा रूग्णालयाचा कारभार नेक, राज्यात नंबर एक!
जिल्ह्याला पहिल्यांदाच मिळाला मान * सिएसला सामाजिकतेची जाण *आरोग्य सुविधा छान

गुरूवार दि. १२ डिसेंबर २०२४ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
आरोग्य सुविधा अनेक, रूग्णालयाचा कारभार नेक, तिसऱ्यांदा 'सीएस' नंबर एक!
* जिल्ह्याला वारंवार मिळतोय मान * सीएसला सामाजिकतेची जाण *आरोग्य सुविधा छान
राज्यात आरोग्य विभागाचा डंका * निर्देशांकाची तंतोतंत अंमलबजावणी *डॉ. अनिल कावरखे यांची उत्कृष्ट कामगिरी

गुरूवार दि. १३ मार्च २०२५ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
झाले चेक, सुविधा अनेक, कारभार नेक...
पाचव्यांदा 'सीएस' नंबर एक!
* जिल्ह्याला वारंवार मिळतोय मान * सीएसला सामाजिकतेची जाण *आरोग्य सुविधा छान
राज्यात डंका वाशीमच सर्वोत्कृष्ट *आरोग्य निर्देशकांवर आधारीत रँकिंग * डीएचओ दुसऱ्यांदा प्रथम

# 'सीएस'च्या उत्कृष्ट कामाचे कार्ड, मोडले सर्व रेकॉर्ड!




* नियमबाह्य कामे हद्दपार
* आरोग्यात झाला सुधार
* रूग्णालयाचा स्वच्छ कारभार
* कायम स्वरूपी बंद भ्रष्टाचार
* शल्यचिकीत्सकाचा पुढाकार


५ मंगळवार दि. ८ एप्रिल २०२५ सिटी न्यूज सुपरफास्ट
सुविधा अनेक, झाले चेक, कारभार नेक, पाचव्यांदा नंबर एक...
जिल्ह्याचा वाढला अभिमान, 'सीएस'चा झाला सन्मान!
आरोग्य मंत्री प्रकाश आंबिटकर यांच्या हस्ते डॉ. अनिल कावरखे यांना पुरस्कार प्रदान

५ रविवार दि. ६ एप्रिल २०२५ सिटी न्यूज सुपरफास्ट
सुविधा अनेक, झाले चेक, कारभार नेक, पाचव्यांदा नंबर एक...
मुख्यमंत्र्याच्या हस्ते 'सीएस'चा गौरव!
*१० महिन्यांतील कामगिरीचे मुल्यमापन : वाशिमच्या शिरपेचात मानाचा तुरा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**कर्तृत्ववान नेतृत्वाच्या हाती सूत्रे आल्यास अशक्यप्राय वाटणारी कामेही कशी सहज शक्य होतात, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालय! राज्याच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाने नुकत्याच जाहीर केलेल्या राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतील ऑक्टोबर महिन्याच्या रँकिंगमध्ये वाशिमचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी पुन्हा एकदा राज्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान पटकावला आहे. ही केवळ आकडेवारीची किमया नसून, गोरगरीब रुग्णांचे आरोग्य सुदृढ करण्याची तळमळ आणि सहकाऱ्यांना कुटुंबाप्रमाणे सोबत घेऊन चालण्याची त्यांची संवेदनशील कार्यशैली हेच या यशाचे खरे गमक आहे. दोन वर्षात जिल्हा सामान्य रूग्णालय एक - दोन वेळा नव्हे तर तब्बल ९ वेळा अव्वल आले आहे.**

काहीतरी नवीन आणि अर्थपूर्ण करण्याची त्यांची सकारात्मक मानसिकता, वरिष्ठांशी असलेला उत्तम समन्वय आणि दूरदृष्टी यामुळेच वाशिमचे नाव महाराष्ट्राच्या आरोग्य नकाशावर तेजस्वीपणे झळकत आहे.

राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गत मातृ आरोग्य, बालआरोग्य, कुटुंबनियोजन अशा ३० महत्त्वाच्या निर्देशकांवर आधारित आरोग्य विभागाच्या पथकाने ऑक्टोबर २०२५ मध्ये जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयांची कसून पाहणी व पडताळणी केली होती. या पाहणीत जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्हा स्त्री रुग्णालयात पुरविण्यात येणाऱ्या सेवांना पथकाने सर्वोत्कृष्टतेचा शेरा दिला आहे.




महिलांच्या सुरक्षित प्रसूतीसाठीची वात्सल्यपूर्ण सेवा, अद्ययावत डायलिसीस सुविधा, कुपोषित बालकांसाठीचे पोषण पुनर्वसन केंद्र (एनआरसी)-जेथे मायेने पोषण केले जाते- गंभीर रुग्णांसाठीचे आयसीयू, अत्याधुनिक आणि सुसज्ज शस्त्रक्रियागृहे... या सर्व सेवा उत्कृष्ट आणि विश्वासार्ह दर्जाच्या असल्याचे नमूद करण्यात आले. मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तपेढी, सोनोग्राफी, सीटी स्कॅन अशा जीवनदायिनी सुविधा येथे सज्ज आहेत. ११ डिसेंबर रोजी जाहीर झालेल्या या अहवालात डॉ. अनिल कावरखे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गाच्या रँकिंगमध्ये महाराष्ट्रात अव्वल स्थान प्राप्त केले आणि वाशिमच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. यापूर्वी, मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्यातही त्यांनी अशीच उत्कृष्ट आणि नेत्रदीपक कामगिरी केली होती, हे येथे नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे.

### माणुसकीचा स्पर्श अन् नागरिकांचा वाढला विश्वास!

पूर्वी निर्देशांक अंमलबजावणीत वाशिम जिल्हा 'टॉप फाईव्ह'मध्येही नव्हता. मात्र, सुमारे अडीच वर्षांपूर्वी डॉ. अनिल कावरखे यांनी सूत्रे स्वीकारल्यानंतर सकारात्मक बदलांची एक नवी पहाट उगवली. कर्मचाऱ्यांना आस्थेची वागणूक आणि रुग्णांशी सौजन्यपूर्ण संवाद यामुळे केवळ आरोग्य संस्थांमध्ये मूलभूत व भौतिक सुविधांची उपलब्धता झाली नाही, तर नियमित स्वच्छता व शिस्तबद्ध व्यवस्थापनामुळे शासकीय आरोग्य सेवांवरील सामान्य नागरिकांचा विश्वास पुन्हा बहरला.

### ऐतिहासिक यश; जिल्ह्याचा सन्मान वाढला...

वाशिमच्या आरोग्य विभागातील इतिहासात प्रथमच एखाद्या जिल्हा शल्य चिकित्सकाने दोन वर्षात राज्यात एक ते दोन वेळा नव्हेतर तब्बल ९ वेळा सर्वोच्च स्थान मिळवले आहे. याआधी कोणालाही ही कामगिरी साधता आली नव्हती. त्यामुळे डॉ. अनिल कावरखे यांचा हा पराक्रम प्रेरणादायी ठरला. त्यांच्या या यशामुळे वाशिम जिल्ह्याचा सन्मान वाढला आहे.

'आरोग्य सेवेच्या बळकटीकरणासाठी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांचे बहुमोल मार्गदर्शन आम्हाला वेळोवेळी मिळत आहे. या संपूर्ण यशाचे श्रेय माझ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी बांधवांच्या समर्पित भावनेला समर्पित आहे. सर्वांच्या एकत्रित, प्रामाणिक प्रयत्नांतूनच वाशिमचा आरोग्य विभाग राज्यात अग्रक्रमांकावर आहे, याचा आम्हाला अभिमान वाटतो. यापुढेही अधिक प्रभावी आणि संवेदनशीलपणे आरोग्य सेवा पुरविणे हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य राहील.

**डॉ. अनिल कावरखे,** जिल्हा शल्यचिकित्सक, वाशिम

## थोडक्यात

### मधुश्रम फाउंडेशनच्यावतीने विविध कार्यक्रम




● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपिर मधुश्रम फाउंडेशनचा 'स्व-वाट' संकल्पः दुर्लक्षितांना संधी देणाऱ्या दुसऱ्या वर्धापन दिनाला मान्यवरांची मांदियाळी. 'मळलेल्या वाटेवरून सगळेच चालतात; परंतु मी माझी स्वतःची वाट तयार करण्याचा प्रयत्न करीत आहे,' या ध्येयाने प्रेरित झालेल्या मधुश्रम फाउंडेशनचा दुसरा वर्धापन दिन नुकताच पिंपरी-चिंचवड येथील सायन्स पार्कच्या सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शिक्षण, आरोग्य आणि समान संधी सर्वा साठी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने 'शाश्वत आणि सर्व समावेशक समुदायाच्या निर्मिती साठी कार्यरत असणाऱ्या फाउंडेशनच्या कारकिर्दीला या सोहळ्याने नवी दिशा दिली. प्रमुख वक्त्यांनी साधला संवाद

कार्यक्रमाच्या व्यासपीठावर विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते, ज्यात विद्या मॅडम (डायरेक्टर, राह नेक्स्ट स्किल्स फाउंडेशन), संतोष शिरसेकर (सीएसआर टीम लीडर यारदी सॉफ्टवेअर इंडिया प्रायवेट लिमिटेड), डॉ. सोमनाथ शिनगारे (बिझनेस कोच), शितल बंडगर (बार्टी प्रकल्प अधिकारी), रितेश कुमार (सीएफपी), प्रमोद बडीगेर (प्रमाणित न्यूट्रिशनिस्ट) आणि के. टी. मुंजे (संचालक, मधुश्रम फाउंडेशन) यांचा समावेश होता. या कार्यक्रमाला विविध स्वयंसेवी संस्था (NGO) आणि त्यांच्या सदस्यांची उपस्थिती लक्षणीय होती.


वैज्ञानिक दृष्टीकोनाचे प्रदर्शन सभागृहा बाहेर लावलेल्या स्टॉल्सनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. महेंद्र पांगारकर यांनी तयार केलेले वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित कॅलेंडर विशेष आकर्षणाचे केंद्र होते. समाजातील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे ही काळाची गरज आहे, या विचारावर त्यांनी यावेळी भर दिला, या शिवाय, संगीता मॅडम यांनी एलजीबीटीक्यू समूहाने तयार केलेले कपडे विक्रीसाठी ठेवले होते, तर प्रमोद बडीगेर यांनी संतुलित आहाराचे महत्त्व समजावून सांगणारा स्टॉल लावला होता, सहकार्याचा मिळाला हात कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेक व्यक्ती आणि संस्थांचे अमूल्य सहकार्य लाभले. यात उमेश मृगजले, सागर मोरे पंकज ढगे, सूरज गायकवाड आणि बार्टी प्रकल्प अधिकारी दिलावर सय्यद सर यांचे विशेष सहकार्य महत्त्वाचे ठरले.

प्रज्ञा यादव यांनी फोटो काढण्यात आणि अमित अमृतकर यांनी रिटर्न गिफ्ट व स्टॅन्डीच्या व्यवस्थापनात मोलाची मदत केली. मधुश्रम फाउंडेशनने समाजाला सोबत घेऊन पुढे जाण्याचा संकल्प या दुसऱ्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने अधिक दृढ केला आहे.

## राजकारण्याचा 'हात', विभाजनाचा 'घात'

# निवडणुकीत जाता जात नाही ती 'जात'!

### *जाती-पातीचाच वार, नात्या गोत्याचा सार, विकासाचे मुद्दे हद्दपार













● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

गुलाबी थंडीत वाशीम शहरातील नगर पालिका निवडणुकीचे वातावरण चांगलेच तपायला सुरूवात झाली.तर ऐकेरी दुहेरी वाटणार लढत तिहेरी होत आहे . तर अनेक ठिकाणी काट्याची टक्कर होणार असून कोणाला चक्कर येणार आहे. हे २१ तारखेला कळणार आहे. वाशीममध्ये उबाठा शिवसेनेच्या रेखा सुरेश मापारी, भाजपाचे अनिल केंद, आमआदमी पार्टीचे सागर कोकास, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे संदिप दहात्रे, वंचितचे वैभव उल्लेमाले हे मैदानात उतरले आहेत. निवडणुकीत विकासाचे मुद्दे हद्दपार झाले असून शेवटच्या क्षणी जाती पातीचाच वार होत आहे जातीचे पोटजातीत विभाजन करून नात्यागोत्यांचा सार घेतल्या जात आहे. त्यामुळे निवडणुकीत जात जात नाही ती 'जात' असे म्हणण्याची वेळ आली आहे. यामध्ये मात्र राजकारण्यांचाच हात आहे.

पुरोगामी मनविणाऱ्या महाराष्ट्रात आजही सत्तेची समिकरणे जाती-जमातीच्या खुंट्याला बांधल्या गेली आहे. सत्तेच्या सारीपाटावर विशेषत: निवडणुकीच्या संदर्भात कास्ट फॅक्टर हा महत्वाचा समजल्या जातो, विकासाचे मुद्दे केव्हाचे हद्दपार झाले आहेत. जातीच्या आधारेच उमेदवाऱ्या दिल्या जात आहेत. त्यानुसार खेळीही राजकीय पक्ष खेळत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यात थेट संघर्षासोबतच आघाडीची बिघाडी झाली. महायुतीची घडी बिघडली. युतीतीलही साथी सोबत नाही. सर्वच पक्षात गटातटात विभाजन झाले. त्या विभाजनामुळे विजयाचे नियोजन बिघडले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अनेकांनी या पक्षातून त्या पक्षात उड्या मारल्या. तर अनेकांना उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष रिंगणात उतरले आहेत. अनेक उमेदवार पक्ष बदलत असतांना सत्तेसाठी नितीमत्ता गहान ठेवत असल्याचे चित्र निर्माण झाले होते. राजकारणात सत्ता महान असून या निवडणुकीत पुन्हा एकदा जातीय समिकरणच समोर येतांना दिसत आहे. विकासाचे मुद्दे हद्दपार झाले आहे, शहर भकास झाले आहे. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा या समिकरणावर राजकारण सुरू आहे. सत्तेसाठी मात्र, तडजोडीतून कुरघोडी करतांना उमेदवार दिसत आहे. जागा वाटपावरून निवडणुकीच्या खऱ्या रणसंग्रामाला सुरूवात झाली आहे.श्रेयवादाच्या व कुरघोडीच्या राजकारणात खऱ्या कार्यकर्त्यांचा मात्र, बळी दिल्या जात असल्याचे चित्र सर्वच पक्षात निर्माण झाले आहे. वरवर ऐकेरी वाटणारी निवडणूक दुहेरी तिहेरी झाली आहे. केवळ दोन दिवस मतदानाला शिल्लक असतांना निवडणुकीत चूरस वाढली आहे. कोण सरस ठरणार, काट्याची टक्कर होणार कोणाला चक्कर येणार याकडे लक्ष लागले आहे.

## मेडशी आरोग्य केंद्राला 'राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र'!

● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●



मेडशी आरोग्य वर्धीनीने राज्यात ९२.५५३ गुणांसह पटकावला बहुमान; आरोग्य सेवेचा 'मेडशी पॅटर्न' आता जिल्ह्यात राबविणार ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्यात वाशिम जिल्ह्याने मोठी झेप घेतली आहे. मालेगाव तालुक्यातील मेडशी प्राथमिक आरोग्य केंद्राने केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून दिला जाणारा 'राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक' (ँए) हा अत्यंत मानाचा बहुमान पटकावला आहे. बाह्य परीक्षकांनी केलेल्या कडक मूल्यमापनात या केंद्राने ९२.५५३ गुण मिळवून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.आरोग्य वर्धिनीचे क्वालिटी ऑडिट २४ आणि २५ नोव्हेंबर २०२५ रोजी केंद्रीय पथकाद्वारे या केंद्राचे सूक्ष्म निरीक्षण करण्यात आले. यामध्ये दवाखान्याची स्वच्छता, औषधांची उपलब्धता, रुग्णांना मिळणारी वागणूक, प्रसूती कक्षातील सोयी, लेबर रूम, प्रयोगशाळेतील अचूकता आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे कर्मचाऱ्यांचे कौशल्य अशा सर्व आघाड्यांवर मेडशी केंद्राने आपली सर्वोत्तम कामगिरी सिद्ध केली.तसेच भविष्यात गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी पुढील '?क्शन प्लॅन' आखले आहे.केवळ प्रमाणपत्र मिळवणे हे उद्दिष्ट नसून, ही गुणवत्ता निरंतर टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे.यामध्ये खालील बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे.सतत सुधारणा मुल्य-मापन अहवालात सुचवलेल्या किरकोळ त्रुटी दूर करून उद्दिष्टाकडे वाटचाल करणे. व वेळोवेळी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देत रुग्णांना अधिक आपुलकीची आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम सेवा मिळावी यासाठी कर्मचाऱ्यांचे नियमित प्रशिक्षण सुरू राहणार आहे.तसेच दक्षता समिती ची सुद्धा स्थानिक स्तरावर गुणवत्ता नियंत्रण समिती स्थापन करून दरमहा आरोग्य सेवांचा आढावा घेतला जाणार. व विशेष म्हणजे रुग्ण प्रतिसाद हा रुग्णांच्या सूचना आणि तक्रारींसाठी विशेष यंत्रणा राबवून त्याद्वारे सेवेचा दर्जा अधिक सुधारणार आहे.या यशाबद्दल मेडशी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी शुभम सपकाळ व परिचारिका, आरोग्य सेवक आणि कर्मचाऱ्यांचे संपूर्ण जिल्ह्यातून कौतुक होत आहे. या प्रमाणपत्रामुळे आरोग्य वर्धीनी केंद्राला आता केंद्राकडून विशेष प्रोत्साहनपर निधी मिळणार असून, त्यातून आरोग्य सेवांचा चेहरामोहरा आणखी बदलणार आहे.

'हा केवळ कागदोपत्री सन्मान नसून, मेडशी परिसरातील सामान्य जनतेला मिळणाऱ्या उत्तम आरोग्याचा पुरावा आहे. आमच्या सर्व डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांच्या सांघिक परिश्रमाचे हे फळ आहे.'

**डॉ.पी.एस.ठोंबरे**
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जि.प.वाशिम

## बालविवाहमुक्त भारतासाठी... विद्यार्थ्यांचा निर्धार!




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने पी. एम. श्री. केंद्रीय विद्यालय, वाशिम येथे दि. १६ डिसेंबर रोजी बालविवाहमुक्त भारत अभियान अंतर्गत तसेच बालहक्क जनजागृती कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

बालविवाहाचे दुष्परिणाम, बालकांचे मूलभूत हक्क तसेच बालसंरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे आणि समाजात बालविवाहास प्रतिबंध घालण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घ्यावा, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव, व्ही. जी. चौखंडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, , पी. एम. श्री. केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य अतुल मून, परिविक्षा अधिकारी गणेश ठाकरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले व कायदा तथा परिविक्षा अधिकारी जिनसाजी चौधरी यांची उपस्थिती होती.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५


# नांदेड, संभाजीनगर नंतर अकोल्यात काँग्रेस वंचित यांच्या आघाडीची शक्यता

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अकोला :** नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर महापालिकेनंतर अकोल्यात काँग्रेस आणि वंचित एकत्र येण्याची चिन्हं निर्माण झाले आहे. अकोल्यात प्राथमिक स्तरावरची बोलणी सुरु करण्याचा आदेश दोन्ही पक्षाच्या वरिष्ठांनी दिला आहे. त्यामुळे अकोल्यात भाजपच्या एकहाती सत्तेला शह देण्याच्या हालचालींना वेग आला आहे. भाजप बंडखोरांनी बंड पुकरल्यानंतर आता वंचित आणि काँग्रेस यांच्यातील एकोपा हा भाजपला अडचणीचा ठरणार आहे. वंचित आणि काँग्रेसने सीट शेअरींग फार्मुला निश्चित केल्यानंतर या विषयावर अंतिम घोषणा होईल. कुठल्याही परिस्थितीत जास्तीत जास्त जागा जिंकणे हे भाजपचे लक्ष असून वंचित, काँग्रेस एकत्र आल्यास नवे समीकरण समोर येऊ शकते. महापालिका निवडणुक घोषित होताच राजकीय समीकरणांनी वेग घेतला आहे.

## काँग्रेसच्या बैठकी लवकरच

◆ निवडणुक घोषित होण्यापुर्वी पार्लिमेंटरी बोर्डाची बैठक होण्याची गरज होती. पण, ती बैठक झाली नसल्याची माहिती आहे. त्यामुळे अद्याप काँग्रेसचे उमेदवार निश्चिती झाली नाही. त्यात काँग्रेसचे अकोला पश्चिम चे आमदार साजीद खान पठाण यांच्यावर जास्तीत जास्त जागा जिंकण्याचा मोठा दबाव आहे. वंचित आणि काँग्रेस यांच्यात घरोबा झाल्यास त्याचा फायदा दोन्ही पक्षाला होणार आहे. अशा परिस्थितीत उमेदवार निश्चिती बरोबर जागा निश्चिती महत्वाची ठरणार आहे.

## भाजपच्या मदतीने एम आय एम च्या प्रभागात विकास कामे

◆ भाजपच्या फायद्यासाठी एम आय एम काम करत असल्याचे चित्र शहरात आहे. विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत एम आय एम च्या नगरसेवकाची भाजप फेवरची भूमिका समोर आली होती. त्यानंतर आता एम आय एम च्या एका नगरसेवकांच्या प्रभागात सर्वाधिक विकास कामे झाली असून भाजप नेत्यांचा छुपा पाठिंबा एम आय एम च्या उमेदवारांना आहे. एम आय एम भाजपची बी टिम आहे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रभाग ९ मध्ये मो. मुस्तफा यांच्या नावाने येणारा विकास निधी आणि झालेले विकास हा भाजपची देण असल्याची ओरड आता सुरु झाली आहे. एम आय एम काँग्रेसला लक्ष करत असून काँग्रेस उमेदवार मुस्लिम प्रभागात पडावे अशा हालचालींना वेग आला आहे. शहरात एम आय एम सोळा जागा लढण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

# दीपक राऊत यांच्या डोक्यावर प्राणघातक हल्ला

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अकोला :** खदान पोलिस स्टेशन हद्दीत दीपक राऊत यांना मारहाण झाली. पण, यात मारहाण करणाऱ्यांच्या सोबत एक पोलिस



कर्मचारी असल्याने या प्रकरणात पोलिस घडलेल्या घटनेप्रमाणे तक्रार दाखल करुन घेत नसल्याची माहिती आहे. तर दीपक राऊत यांच्या डोक्यावर प्राणघातक हल्ला केला असताना शासकीय रुग्णालयात योग्य तो अहवाल दिला गेला नाही इतकेच काय उपचार करण्यात काटकसर केल्याची माहिती मिळाली आहे. या सर्व प्रकरणात पोलिस अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# आम्हाला मत न दिल्यास लाडकी बहीण योजना बंद करू!

प्रतिनिधी १७ डिसेंबर

◆ भाजपचे माजी महानराध्यक्ष अशोक ओळंबे यांचा आरोप

**अकोला :** अकोल्यातल्या एका नेत्यानं लाडकी बहीण योजनेचा उल्लेख करत आम्हाला मत न दिल्यास लाडकी बहिणचे १५०० रुपये बंद होतील अशी धमकी भाजप नेत्यानं दिल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. भाजपचे माजी महानराध्यक्ष अशोक ओळंबे यांच्या आरोपाने खळबळ उडाली आहे अकोल्यात एका कार्यक्रमात बोलताना भाजपकडून मतदारांना ब्लॅकमेल केलं जात असल्याचा आरोप केलाय.

अशोक ओळंबे हे अकोल्यातून विधानसभेसाठी इच्छुक होते. पण त्यांना तिकीट नाकारण्यात आलं होतं. तेव्हा अशोक ओळंबे यांनी अपक्ष निवडणूक लढली. यामुळे भाजपच्या मतांचं विभाजन होऊन काँग्रेसला फायदा झाला. निवडणूक निकालानंतर भाजपनं ओळंबे यांना निलंबित केलं. भाजपने निलंबित केल्यानंतर अशोक ओळंबे हे काँग्रेसमध्ये सक्रीय झाले. महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेसचा झेंडा फडकावण्यासाठी ते सज्ज झाले असून प्रचारात भाजपवर आरोपांची राळ उडवलीय. भाजपवर गंभीर आरोप करताना त्यांनी टीकाही केलीय. अकोल्यात भाजपच्या बंडखोर नेत्यांची सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. यात भाजपचे ७ माजी नगरसेवक आणि नाराज असलेल्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती लावली होती. यावेळी बोलताना अशोक ओळंबे म्हणाले की, आम्हाला मत दिलं नाही तर लाडकी बहीण योजना बंद पडेल असा प्रचार भाजपच्या माजी नगरसेवकांकडून पसरवला जात आहे. लाडकी बहीण आणि महापालिकेचा काही संबंध नाहीय. त्यामुळेच ब्लॅकमेल केलं जात असल्याचं ओळंबे म्हणाले. महापालिकेसाठी आलेला पाचशे कोटींचा निधी जंगल भागात वळवल्याचा आरोपही ओळंबे यांनी केलाय. जिथं कुणी राहत नाही तिथं लेआऊट पाडल्यात. ते धनाढ्य आणि जनप्रतिनिधींचे असून तिथं भूमिगत गटार योजनेचं काम या निधीतून केलं जात आहे असंही ओळंबे यांनी म्हटलं.

# तिकीट मागणाऱ्यांची सर्वाधिक संख्या भाजपमध्ये

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अकोला :** अकोला महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजताच शहरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. इच्छुक उमेदवार, नेते आणि कार्यकर्ते सभा, बैठका आणि मतदारांना आकर्षित करण्यात व्यस्त झाले आहेत. सर्वांचे एकमेव ध्येय निवडून येणे हेच असल्याचे दिसत आहे, त्यामुळे अनेक इच्छुक उमेदवार सुरक्षित राजकीय पक्षाच्या शोधात असून पक्षात प्रवेश करून निवडून येण्याचे स्वप्न पाहत आहेत. पक्षाकडून १ हजार २२४ इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या दावेदारातून २४० नावांची शिफारस होणार असल्याचे कळते.

अकोला महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, शिवसेना, वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस या मुख्य पक्षांसह इतर राजकीय पक्षांमध्ये सध्या इच्छुकांच्या मुलाखती सुरू आहेत. सर्वाधिक गर्दी भारतीय जनता पक्षात पाहायला मिळत आहे; येथे एका जागेसाठी १० पेक्षा जास्त उमेदवारांनी अर्ज केले आहेत. दुसरीकडे, पश्चिम अकोला मतदारसंघातून साजिद खान पठाण आमदार म्हणून निवडून आल्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट पडल्यामुळे त्यांची ताकद विभागली गेली आहे. या निवडणुकीत प्रत्येकाला विजय हवा आहे, पण त्यासाठी त्यांना आपली स्थिती भक्कम हवी आहे. याच कारणामुळे अनेक इच्छुक उमेदवार सुरक्षित पक्षाच्या शोधात आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादीसोबतच काँग्रेस आणि वंचितमधील काही उमेदवारही सोयीच्या पक्षात सामील होऊ लागले आहेत. काँग्रेस उमदेवारांच्या यादीवर प्रदेशस्तरावर चर्चा रंगली आहे. या निवडणुकीत मोठ्या राजकीय उलथापालथीची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जर विरोधी पक्ष एकत्र लढले, तर भारतीय जनता पक्षासमोर अडचणी निर्माण होऊ शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. पक्ष संघटना, जनसंपर्क आणि निवडून येण्याची क्षमता या निकषांवरच उमेदवारी दिली जाणार आहे. त्यामुळे अखेर कोणाला तिकीट मिळते, याबाबत उत्सुकता वाढली आहे. यावेळेस सर्वच राजकीय दल नवीन चेहऱ्यांना संधी देण्याच्या तयारीत दिसत आहेत. यामुळे जुन्या उमेदवारांना तिकीट नाकारले गेल्यास ते बंडाचे निशाण फडकवू शकतात, ज्यामुळे सर्वच राजकीय पक्षांची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. महापालिका क्षेत्रातील २० प्रभागातील ८० नगरसेवक पदासाठी १ हजारावर इछुकांनी दावा सादर केल्यामुळे योग्य उमेदवार निवडीचे आव्हान पक्षासमोर आहे.

# शरद पवारांना पहिला धक्का ; कल्पना महाले यांचा भाजपमध्ये प्रवेश

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**पुणे :** निवडणूक जाहीर होताच राष्ट्रवादी शरद पवार गटाला भाजपाने मोठा धक्का दिला आहे. धुळ्याच्या माजी महापौर कल्पना महाले यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. पालकमंत्री जयकुमार रावळ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कल्पना महाले यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. कल्पना महाले यांच्यासोबत शिवसेनेचे माजी नगरसेवक गुलाब माळी, कैलास मराठे यांनी देखील भाजपमध्ये प्रवेश केला आहे. महाले यांनी आपल्या अनेक कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केल्यानं हा धुळ्यामध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठा धक्का मानला जात आहे.

# फक्त अपक्षांचे तिकिट फायनल, पक्षीय उमेदवारांची धावाधाव

प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अकोला :** प्रभागातील इच्छूक कार्यकर्त्याला राजकीय नेते तुम्ही कामाला लागा असा सल्ला देत धीर देत आहे. पण, या धीराने इच्छूकांच्या तळपायाला घाम फुटला आहे. तिकिट मिळते की नाही, तिकिट कोणाला जाहिर होते अशा द्विधा मनस्थितीत पक्षीय कार्यकर्ता आहे. त्याच वेळी अपक्ष मात्र कामाला लागले असून ते स्वतःच नेते ठरले असून त्यांनी मतदार संघ पिंजून काढला आहे.

राज्यात अकोल्यात सहा - सात मोठे राजकीय पक्ष आहे. यात भाजपा क्रमांक एकवर दूसऱ्या स्थानावर काँग्रेस, तिसऱ्या स्थानावर उध्दव ठाकरे यांची शिवसेना होती. उध्दव ठाकरे गटाचे शिवसैनिक आणि पाच नगरसेवक हे शिंदे सेनेत गेले अर्थात शिवसेना या पक्षात गेले. चौथ्या स्थानावर राष्ट्रवादी काँग्रेस, पाचव्या स्थानावर २०१७ च्या निवडणूकीत भारिप बमसं आताचे वंचित बहुजन आघाडी, एम आय एम आणि अपक्ष अशी काय ती स्थिती होती. इच्छूकांचा सर्वात लोकप्रिय पक्ष भाजप आहे. त्यामुळे भाजपचे तिकिट मिळविण्यासाठी कार्यकर्ते, पदाधिकारी इच्छूक आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकाला तिकिट मिळण्याची आशा आहे. कोणाला पत्नीसाठी कोणाला स्वतःसाठी उमेदवारी पाहिजे. पण, जो पर्यंत पक्षाच्या संसदीय बोर्डात तिकिट निश्चित होत नाही तो पर्यंत उमेदवारी अंतिम मानली जात नाही. त्याच बरोबर पक्षाच्या तिकिटासोबत ए बी फार्म महत्वाचा असतो. हे सर्व प्राप्त करण्यासाठी पक्षीय इच्छूक उमेदवारांची धावाधाव होत आहे. पण, त्याच वेळी बिनधास्त असलेले अपक्ष मतदारांच्या गाठीभेटी घेत प्रचाराला लागले आहे.

# महापालिका निवडणूक ; तिसऱ्या आघाडीने बांधली मोट!

◆ शहर विकासासाठी स्वाभिमानींचा थेट नागरिकांशी संवाद




प्रतिनिधी १७ डिसेंबर

**अकोला :** राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी महानगरपालिका निवडणुकीची घोषणा करताच अकोल्यातील स्वाभिमानी कार्यकर्ते मैदानात उतरले. मंगळवारी शहरातील एका लॉनमध्ये नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांनी अकोल्याच्या विकासाबाबत जनभावना जाणून घेतल्या. या संवादातून एक स्पष्ट संकेत पुढे आला की, मनपा निवडणुकीत महायुतीला शह देण्यासाठी नवीन आघाडी उभी राहण्याची चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे. मनपा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर भाजपाने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली असताना, राज्यभरात पक्षातून बाहेर पडलेल्या नेत्यांची घरवापसी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, अकोल्यात हा घरवापसीचा पॅटर्न अपयशी ठरताना दिसत आहे. उलट, अकोल्यात हा अपवादच आता भाजपसाठी डोकेदुखी ठरणाऱ्या नव्या राजकीय समीकरणांना जन्म देत आहे. आधीच भाजपाचा बालेकिल्ला मानला जाणारा पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघ हातातून निसटलेला असताना, आता मनपा निवडणुकीतही भाजप?समोर मोठे आव्हान उभे ठाकण्याची चिन्हे आहेत. या नव्या आघाडीत भाजपातीलच अनेक स्वाभिमानी पदाधिकारी व कार्यकर्ते सामील होण्याची शक्यता वर्तवली जात असून, तसे घडल्यास त्याचा थेट फटका भाजपाच्या उमेदवारांच्या मतपेटीवर बसणार, असे मत राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. या नागरिक संवादाच्या वेळी मंचावर माजी नगरसेवक हरीश अलीमचंदानी, डॉ. अशोक ओळंबे, ॲड. गिरीश गोखले, आशिष पवित्रकार, हरिभाऊ काळे, चोटमल सारडा, पांडुरंग काळणे, विठ्ठलराव गाढे, मधुकर रगडे, प्रा. गणेश बोरकर प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाला शहरातील सर्वच परिसरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. एकूणच, अकोल्याच्या राजकारणात नव्या आघाडीचा उदय आणि भाजपसाठी वाढती आव्हाने, हे मनपा निवडणुकीपूर्वीचे ठळक चित्र बनत असल्याचे स्पष्ट होत आहे.

# महानगरपालिका निवडणुकीच्या घोषणेने अडचण

प्रतिनिधी १७ डिसेंबर

## लाडकी बहीण योजनेच्या निधीला आचारसंहितेचा फटका निवडणूक होईपर्यंत पैसे खात्यात जमा होणे कठीण

**अकोला :** राज्यात महानगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. मात्र, या निवडणूक आचारसंहितेमुळे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थ्यांना मोठा फटका बसला आहे. आचारसंहिता लागू झाल्यामुळे आता निवडणुका संपेपर्यंत या योजनेचे पैसे महिलांच्या खात्यात जमा होणे कठीण दिसत आहे.


लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन महिन्यांचा हप्ता अद्याप मिळालेला नाही. नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर, २२ डिसेंबरच्या सुमारास हा निधी खात्यात जमा होण्याची शक्यता होती. परंतु, त्यापूर्वीच सोमवार, १५ डिसेंबर रोजी राज्य निवडणूक आयोगाने मनपा निवडणुकांची घोषणा केली. १५ जानेवारी रोजी मतदान होईल. आचारसंहिता मतमोजणी संपेपर्यंत म्हणजेच १६ जानेवारीपर्यंत लागू राहणार आहे. महिलांना आता नोव्हेंबर आणि डिसेंबरसह जानेवारी महिन्याच्या हप्त्यासाठी देखील आचारसंहिता संपण्याची वाट पाहावी लागणार आहे. महानगरपालिका निवडणुका जाहीर होण्यापूर्वी थकीत पैसे मिळतील अशी आशा महिलांना होती, मात्र आचारसंहिता लागू झाल्याने त्यांच्या आशेवर पाणी फेरले गेले आहे. आता निवडणुकीच्या निकालानंतरच महिलांच्या खात्यात पैसे जमा होण्याची शक्यता आहे.

# अपघातात विद्यार्थिनीचा मृत्यू !

**अकोला :** कॉलेजला जात असताना समोरून दुचाकी धडकल्याने झालेल्या भीषण अपघातात विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना बुलढाण्यातील डोंगरशेवली गावाजवळ घडली. ऋतूजा सावळे (१९ वर्ष, रा. डोंगरशेवली) असे अपघातात ठार झालेल्या विद्यार्थिनीचे नाव असून, ती बुलढाणा येथील राजर्षी शाहू महाराज आयुर्वेद महाविद्यालयात शिक्षण घेत होती. काल सकाळी महाविद्यालयाला जात असतानाच समोरून येणाऱ्या दुचाकीने ऋतुजाला धडक दिली.













हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK